# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र





०७१८४ - २५४७०२ sp.bhandara@gov.in / pilcb.bhandara@gov.in


जा.क्र. जनसंपर्क कक्ष/वार्तापत्र/ ५५९ /पोलीस अधिक्षक कार्यालय भंडारा, दिनांकः- १७ /१०/२०१८

## "पोलीस हुतात्मा स्मृतीदिनानिमीत्त सद्भावणा दौड चे आयोजन"

**भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे दिनांक २३/१०/२०१८ रोजी पहाटे ५.०० वा. संपन्न होणार.**

भंडारा :- दिनांक २१/१०/२०१८ रोजी शहीद पोलीसांचे स्मृती प्रित्यर्थ पोलीस हुतात्मा दिन देशात पाळला जातो शहीद पोलीसांबाबत स्मृती जागृत करण्याकरीता भंडारा जिल्हा पोलीस दलातर्फे दिनांक २३/१०/२०१८ रोजी सद्भावना दौडचे आयोजन करण्यात आले आहे. भंडारा शहरातील व जिल्हयातील तमाम नागरीकांनी सद्भावना दौडमध्ये सामील होवुन शहीद पोलीसांच्या स्मृती जागृत करून त्यांना आदरांजली अर्पण करावी असे आवाहन श्रीमती विनीता साहू मा. पोलीस अधीक्षक, जिल्हा भंडारा व भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे. दिनांक २३/१०/२०१८ रोजी सकाळी ५.०० वा. कवायत मैदान पोलीस मुख्यालय भंडारा येथुन प्रमुख पाहुण्यांचे हस्ते हिरवी झेंडी दाखवुन सदभावना दौड सुरू होणार असुन यामध्ये १८ वर्षा वरील पुरूष खुला गट हे १० कि.मी. करीता नांव नोंदणी करू शकतात. त्याकरीता त्रिमुर्ती चौक - बसस्टॅड - गांधी चौक - शास्त्री चौक - शासकीय तंत्रनिकेतन — गणेशनगर ले आउट तेथुन परत त्याच मार्गे पोलीस मुख्यालय अशी मार्गीका ठरवण्यात आली आहे. १८ वर्षा वरील महिला खुला गट हे ५ कि.मी. करीता नोंदणी करू शकतात. त्याकरीता पोलीस मुख्यालय त्रिमुर्ती चौक - शास्त्री चौक - आयएमए हॉल व तेथुन त्याच मार्गे पोलीस मुख्यालय परत अशाप्रकारे मार्गीका ठेवण्यात आली आहे. पोलीस अधिकारी व कर्मचारी ३ कि.मी. सद्भावना दौड करीता नांव नोंदणी करू शकतात. त्यांचेकरीता पोलीस मुख्यालय त्रिमुर्ती चौक - शास्त्री चौक व तेथुन पोलीस मुख्यालय परत अशा पध्दतीने मार्गीका आखण्यात आलेली असुन नागरीकांना/स्पर्धकांना नाव नोंदणी करण्याकरीता स्पर्धक पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा संपर्क क्रमांक ०७१८४-२५२४००, पोलीस स्टेशन भंडारा संपर्क क्रमांक ०७१८४-२५२३०३ येथे कधीही तर चैतण्य व्यायाम शाळा पोलीस मुख्यालय भंडारा या ठिकाणी सकाळी ०६.०० ते १०.०० व संध्याकाळी १७.०० ते १९.०० या वेळेत नोंदणी करू शकतात त्याच प्रमाणे व्हॉट्सअॅप क्रमांक ९४०५८३११०० व भंडारा पोलीसांचे अधिकृत फेसबुक व ट्वीटर अकाउंटवर नांव नोंदणी करू शकतात. विजयी उमेदवारांना मान्यवरांचे हस्ते प्रथम, द्वितीय व तृतीय पारीतोषीके व प्रशस्तीपत्रके देण्यात येतील.

तरी जास्तीत जास्त संख्येने नागरीकांनी सहभागी होवुन जिल्हयातील व देशातील हुतात्मा पोलीसांना आदराजंली व्यक्त करण्याकरीता सद्भावना दौड मध्ये सहभागी व्हावे असे आवाहन भंडारा जिल्हा पोलीस दला तर्फे करण्यात येत आहे.

(जितेंद्र के. आडोळे)
पोलीस उपनिरीक्षक,
जनसंपर्क अधिकारी
संपर्क क्र. ०९४०३१०९७२०

पोलीस अधीक्षक कार्यालय भंडारा (म.रा.)

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनीधी यांना उपरोक्त माहिती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत**, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.